स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

स्वराज्याच्या उभारणीत सेनापतींचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास

संशोधक

काळे नागेश शिवाजीराव

जुना कौठा, नांदेड ४३१६०३

ता. जि नांदेड

संपर्क क्र. ९०७५३४९९९०

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. कोंडेकर राजू शिवाजी

इतिहास विभाग प्रमुख

राजीव गांधी वरिष्ठ महाविद्यालय ता मुदखेड जि. नांदेड

संपर्क क्र. ९८५०८८१४९६

एप्रिल- २०२२

<u>अनुक्रमणिका</u>

विवरण	पृष्ठ क्र.
१. प्रस्तावना	1
२. संशोधन विषयाची निवड	2
३. संशोधन विषयाचा कालखंड	3
४. संशोधनाचा हेतू	4
५. संशोधनाची उद्दिष्टे	5
६. संशोधन पध्दती	6
७. गृहितके	6
८. संशोधन विषयाची व्याप्ती व स्वरूप	7
१. प्रकरण पहिले प्रस्तावना, विषय निवडीची गरज, महत्त्व व प्रकरण रचना.	8
२.प्रकरण दुसरे छत्रपती शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील सेनापतींचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान व भूमिका.	8
३. प्रकरण तिसरे स्वराज्याच्या उभारणीत सेनापती नेताजी पालकर यांचे योगदान.	9
४. प्रकरण चौथे स्वराज्याच्या उभारणीत सेनापती प्रतापराव गुजर यांचे योगदान	9
५. प्रकरण पाचवे स्वराज्याच्या उभारणीत सेनापती हंबीरराव मोहिते यांचे योगदान.	9
६. प्रकरण सहावे उपसंहार व निष्कर्ष	10
संदर्भ सूची	11

प्रस्तावना :

युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची भारताच्या श्रेष्ठ राष्ट्रपुरुषात गणना केली जाते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या असामान्य कार्याने श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. हे त्यांचे कार्य अलौकिक असेच आहे. मध्ययुगीन काळात पाच-सहाशे वर्षे सतत चालू राहिलेल्या मुस्लीम आक्रमणामुळे येथील जनता स्वातंत्र्याला पारखी झाली होती. महाराष्ट्रात चौदाव्या शतकात यादवांचे राज्य संपुष्टात आल्यापासून जवळजवळ तीनशे वर्षे स्वातंत्र्याचा सूर्य उगवलाच नव्हता. उत्तर महाराष्ट्रावर निजामशाहीचे तर दक्षिण महाराष्ट्रावर आदिलशाहीचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. उत्तर भारतावर बलाढ्य मुघल सत्ता प्रस्थापित झाली होती. अशा या बलाढ्य इस्लामी सत्तांना प्रतिकार करून श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात स्वराज्याची स्थापना केली.

आदिलशाही राज्यातील एका सरंजामी सरदाराच्या मुलाने प्रथम आदिलशाहीला आणि नंतर बलाढ्य मुघल सत्तेला आव्हान देवून स्वराज्य स्थापन करणे, ही तत्कालीन काळातील असामान्य अशीच घटना होती. ही कामगिरी पार पाडत असताना श्री छत्रपती शिवाजी राजांना अनेक घटकांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहाय्य झाले. पिता शहाजी राजांकडून त्यांना भोसले घराण्याची प्रतिष्ठा, पुण्याची जहागिरी व लष्करी सामर्थ्य मिळाले. याच जहागिरीत त्यांनी स्वराज्य स्थापनेस सुरूवात केली. याबरोबरच जन्मजात शौर्य, धाडस इत्यादी गुणांचा वारसाही शहाजी राजांकडून मिळाला होता. निजामशाहीचे पुनरुज्जीवन करण्याचा शहाजी राजांनी केलेल्या प्रयत्नांचा धडा त्यांच्यापुढे होता. त्याचाही प्रभाव श्री छत्रपती शिवाजी राजांवर निश्चितपणे पडला असावा. छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श व्यक्तिमत्त्व घडविण्यात माता जिजाबाईंचे योगदानही महत्त्वपूर्ण होते. बालशिवाजीला योग्य शिक्षण व मार्गदर्शन देवून त्यांच्याकडून स्वराज्य स्थापनेची सिद्धता माता जिजाबाईने करवून घेतली.

स्वराज्य स्थापनेच्या या महान कार्यात मावळातील अनेक सहकाऱ्यांची महाराजांना साथ मिळाली. आपल्या या कार्यात महाराजांनी सामान्यातील सामान्य माणसालाही सहभागी करून घेतले. आपापसात झगडणाऱ्या, वतनासाठी खून करणाऱ्या आणि मुसलमान बादशहाची चाकरी करण्यातच धन्यता मानणाऱ्या मावळातील वतनदारांना त्यांनी एकत्र करून स्वराज्य कार्यात

सामील केले. ज्या सरदार वतनदारांनी स्वराज्य कार्यास विरोध केला, त्यांचा सामोपचाराने किंवा बळाचा वापर करून श्री छत्रपती शिवाजी राजांनी मोड केला.

स्वराज्य उभारणीच्या कामी छत्रपती शिवाजी राजांनी वतनदार देशमुखाप्रमाणेच, सर्व जातीधर्माच्या व सामान्य कुटुंबातील धाडसी व कर्तबगार व्यक्तींनाही सामील करून घेतले. त्यांच्या या कार्यात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अनेकजणांनी सुरुवातीपासूनच त्यांना साथ दिली. बाजी पासलकर, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे यासारख्या सहकाऱ्यांनी आत्मबलिदान केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्यस्थापना व स्वराज्य उभारणीसाठी प्रारंभीच्या काळात ज्या काही सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले त्यांच्या कार्याचा आढावा या संशोधनाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न असेल.

संशोधन विषयाची निवड

श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन महाराष्ट्रात स्थापन केलेले स्वराज्य हा एक अलौकिक व अद्‌वितीय असा पराक्रम होता. संपूर्ण भारत परकिय सत्तेच्या अधिपत्याखाली गेलेला असताना आपल्या अलौकिक अशा पराक्रमाच्या जोरावर महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा शुभारंभ केला. या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात त्यांनी सर्वसामान्य रयतेलाही सहभागी करुन घेतले. त्यांच्यात स्वराज्याबद्‌दल आपुलकीची, स्वराज्यासाठी लढा देण्याची उर्मी आणि प्रसंगी प्राण देण्याची जिद्‌दही निर्माण केली. स्वराज्य स्थापना व स्वराज्य उभारणी होत असताना अनेक मावळे महाराजांच्या तालमीत तयार झाले. सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तींमधूनच महापराक्रमी योद्‌धे निर्माण झाले. श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी सैन्याची जमवाजमव करून त्यांच्यामधील शूर व पराक्रमी व्यक्तीची सेनापतीपदी निवड केली. श्री छत्रपती शिवरायांच्या पस्तीस वर्षांच्या कारकिर्दीत पाच शूर वीर योद्‌धांनी सेनापतीपद भूषविले. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दिच्या प्रारंभीच्या कालखंडापासूनच सेनापती पदाला महत्त्वपूर्ण स्थान होते. महाराजांना लाभलेले सेनापती एकापेक्षा एक सरस होते. त्यांनी आपल्या कार्य कर्तृत्वाने सेनापती पदाला झळाळी व वलय प्राप्त करून दिले.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य होते. अनियंत्रित राजेशाही हे वैशिष्ट्य असणाऱ्या मध्ययुगात लोककल्याणकारी व जनतेला आपलेसे वाटणारे स्वराज्य श्री छत्रपती शिवरायांनी निर्माण केले. आदिलशाही व मुगलशाही या समकालीन बलाढ्य

अशा सत्तांना नामोहरम करून महाराजांनी आपले स्वराज्य निर्माण केले. या कार्यात महाराजांना त्यांच्या सेनापतींनी केलेले सहकार्य अतिशय मौल्यवान होते. त्यामुळे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दित झालेल्या सेनापतींच्या कार्यावर सलगपणे प्रकाश टाकणे गरजेचे आहे असे वाटू लागले व यातूनच प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड केली.

संशोधन विषयाचा कालखंड :

श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० ला शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांचे बालपण शिवनेरी किल्ला, सिंदखेडराजा व बंगळूर अशा ठिकाणी गेले. वयाच्या १२ व्या वर्षी शहाजी महाराजांनी त्यांची रवानगी राजमाता जिजाबाईसोबत पुण्याच्या जहागिरीचा कारभार करण्यासाठी बंगळूरहून महाराष्ट्रात केली. तसेच त्यांच्याबरोबर मदतीसाठी काही निवडक सरदारांची मंत्री म्हणून रवानगीही केली. यामध्ये सेनापती म्हणून माणकोजी दहातोंडे यांचा समावेश होता. शिवाजी महाराज पुण्याला स्थिरस्थावर होताच स्वराज्य स्थापनेस प्रयत्न सुरू केले. अनेक संकटांना तोंड देवून महाराजांनी 'स्वराज्याची' स्थापना केली. त्यांच्या या महान कार्यात त्यांच्या मंत्रीमंडळातील सेनापतींनी मोलाचे सहकार्य केले. तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतरही गादीवर येणाऱ्या पुढील छत्रपतींनाही सेनापतींनी मोलाची साथ दिली होती.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचा साधारणत: इसवी सन १६४५ ते १६८० हा महत्त्वाचा कालखंड आहे. परंत महाराजांच्या निधना नंतर सेनापती पदावर असलेले हंबीरराव मोहिते हे पुढे सन १६८७ पर्यंत सेनापती पदावर कायम होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पश्चात स्वराज्य रक्षणासाठी अत्यंत मोलाचे कार्य केले.

संशोधनाचा हेतू :

श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य ही इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाची अशी घटना आहे. महाराजांनी सुरुवातीपासूनच स्वराज्याकडे एक स्वतंत्र व सार्वभौम सत्ता या दृष्टीनेच पाहिले होते. म्हणूनच त्यांनी इतर राज्यकर्त्याप्रमाणे वेग-वेगळ्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या होत्या. महाराजांच्या राज्याभिषेकापर्यंत मंत्र्यामध्ये व त्यांच्या पदामध्ये अनेक बदल केले. कमकुवत व्यक्तींना त्यांनी आपल्या मंत्रीमंडळात ठेवले नाही. जे कर्तबगार व पराक्रमी होते त्यांनाच संधी दिली. राज्याभिषेकाच्यावेळी महाराजांचे मंत्रीमंडळ मंत्र्यांच्या संख्येच्या दृष्टीने व

योग्य व्यक्तींच्या निवडीने परिपूर्ण बनले होते. या अष्टप्रधान मंडळातील सेनापतींनी स्वराज्य विस्तार व स्वराज्य रक्षणाकामी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. संपूर्ण सैन्यावर आधिपत्य असणाऱ्या या सेनापतींनी महाराजांना अनेक कठीण प्रसंगी मदत केली. सह्याद्रीच्या डोंगराळ भागातील सर्वसामान्य जनतेतून महाराजांनी असामान्य लष्करी योग्यतेचे सेनापती निर्माण केले. सेनापतीचे प्रमुख काम म्हणजे लढाया करणे हे होते. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्वतः एक असामान्य योद्धे होते. अनेक महत्त्वाच्या लढायांचे नेतृत्त्व त्यांनी स्वतः केले. त्यामुळे सेनापतींचे कार्य तसे दुर्लक्षितच राहिले आहे. महाराजांना सर्वोतोपरी मदत करणाऱ्या आणि महाराष्ट्रापासून जिंजीपर्यंत पसरलेल्या स्वराज्याचे संवर्धन करताना सेनापतींनी केलेल्या कार्याचा इतिहास सर्वज्ञात व्हावा हा मुख्य हेतू होय.

संशोधनाची उद्‌दिष्टे :

सदरील संशोधन करत असताना खालील उद्‌दिष्टे समोर ठेवून विषयाची मांडणी करावी लागेल.

१. छत्रपती शिवरायांच्या सेनापतींचा स्वराज्याच्या उभारणीमध्ये असलेल्या योगदानाचा शोध घेणे.

२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील सेनापतींचे महत्व अभ्यासणे.

३. सेनापतींची स्वराज्य निर्मितीत असलेली महत्वाची भूमिका अभ्यासणे.

४. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व सेनापतींविषयीची माहिती एकत्रित करणे.

५. छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे सेनापती यांच्या संबंधाचे विश्लेषण करणे.

६. सेनापती नेताजी पालकर यांच्या कार्याचा आढावा घेणे.

७. सेनापती प्रतापराव गुजर यांच्या कार्याचा आढावा घेणे.

८. सेनापती हंबीरराव मोहिते यांचे कार्य अभ्यासणे.

९. तत्कालिन काळातील महाराजांच्या सेनापतींचा प्रभाव तपासणे.

१०. सेनापतींच्या युद्‌ध नीतीचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :

सदरील संशोधन मानवव्य विद्या शाखे अंतर्गत इतिहास विषयातील असल्यामुळे संशोधन करत असताना प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. अप्रकाशित व प्रकाशित प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ साधनांचे परीक्षण करून त्याआधारे प्रकरणांची मांडणी करण्यात येईल. तसेच संशोधनाच्या पाठीशी असलेल्या सैद्धांतिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वर्णनात्मक पद्धती व विश्लेषणात्मक पद्धतीचाही वापर केला जाईल.

गृहितके :

१. श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्व सेनापती हे ग्रामीण भागातून आलेले शुर विर सेनानी होते.

२. स्वराज्य उभारणीत श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याच्या खालोखाल सेनापतींचे कार्यही महत्त्वपूर्ण आहे.

३. श्री छत्रपती शिवाजी महाराज व्यक्तीची कर्तबगारी पाहूनच त्याची सेनापतीपदी नियुक्ती करत असत.

४. श्री छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे सेनापती यांच्यातील संबंध अनेकवेळा ताणले गेले होते.

५. स्वराज्य उभारणीत सेनापती नेताजी पालकर व सेनापती प्रतापराव गुजर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

६. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य विस्ताराच्या कार्यात सेनापती हंबीरराव मोहिते यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

संशोधन विषयाची व्याप्ती व स्वरूप :

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेले स्वराज्य हे खऱ्या अर्थाने रयतेचे कल्याणकारी असे राज्य होते. हे राज्य माझे आहे असे येथील प्रत्येकाला वाटत होते. शिवाजी महाराजांनी सन १६७४ ला स्वतःचा विधीवत राज्याभिषेक करवून घेवून

स्वराज्याचे सार्वभौम राज्यात रूपांतर केले. तसेच आपल्या मृत्यूपर्यंत म्हणजे १६८० पर्यंत एका प्रबळ व विशाल राज्याची निर्मिती केली. तत्कालिन इतर सत्तांप्रमाणेच छत्रपतींचे स्वराज्य लष्करी ताकदीवरच उभारलेले होते. आपल्या स्वराज्याचे रक्षण व विस्तार करण्यासाठी महाराजांना अनेक मोहिमा काढाव्या लागल्या होत्या. तसेच अनेक शत्रूच्या आक्रमणालाही तोंड द्यावे लागले होते. प्रारंभी स्वराज्य लहान होते, सैन्यसंख्याही मर्यादित होती, प्रशासनाचा व्यापही कमी होता. तेंव्हा शिवाजी महाराजांचे सैन्यावर प्रत्यक्ष अधिपत्य होते. परंतु उत्तरोत्तर स्वराज्याचा विस्तार वाढत गेल्यानंतर महाराजांनी स्वराज्याच्या सैन्याचे नेतृत्त्व सेनापतींच्या ताब्यात देवून स्वराज्य रक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली. सेनापतींनीही ही जबाबदारी प्राणपणाने जपून प्रत्येक मोहिमेत महाराजांना सक्रिय पाठींबा दिला. तसेच अनेक मोहिमा स्वतःच्या नेतृत्त्वाखाली यशस्वीपणे पार पाडल्या.

महाराजांनी सेनापतींवर पूर्ण विश्वास ठेवला होता. तरीही सेनापतींना त्यांनी कधीही वरचढ किंवा अनियंत्रीत होवू दिले नाही. नेताजी पालकरांनी पन्हाळगडच्या सन १६६६ सालच्या स्वारीत केलेल्या दिरंगाईमुळे मराठ्यांना गड घेण्यात अपयश आले. त्यामुळे महाराजांनी नेताजींना सेनापतीपदावरून दूर केले तर प्रतापराव गुजरांना बहलोलखानाचा पूर्णपणे बंदोबस्त न केल्यामुळे महाराजांनी कडक शब्दात समज दिली होती. यावरून महाराजांचा सेनापतींवर असणारी वचक व दरारा दिसून येतो. महाराजांचे सगळे सेनापती हे मराठ्यांच्या स्वभावधर्माप्रमाणे शूर, धाडसी, लढाऊ व स्वाभिमानी होते. काही वेळेला ते जबाबदारीने न वागता शिपाईगिरीने वागत याचे महाराजांना वाईट वाटत होते. म्हणून त्यांनी पुढील काळात सेनापती निवडताना शूरवीर परंतु धीरगंभरी, राजनीति तज्ञ, संयमी अशा हंबीररावांची नेमणूक सेनापती पदावर केली होती.

श्री छत्रपती शिवाजी महाराज हे स्वतः एक राजकारणकुशल व रणधुरंधर सेनानी होते. तरीही जेव्हा संधी मिळेल तेव्हा महाराजांच्या सेनापतींनी आपले कौशल्य सिद्ध करून स्वराज्यनिर्मितीत अतुलनीय योगदान दिले आहे. महाराजांचे सेनापती हे मराठ्यांच्या पराक्रमी, धाडसी व लढवय्या प्रतिमेचे मूर्तिमंत प्रतिक आहेत. त्यामुळे या सर्व सेनापतींचा उपलब्ध पुराव्यांच्या आधारे अभ्यास झाल्यास इतिहासात मोलाची भर पडेल व इतिहास संशोधकांसाठी उपयुक्तही ठरेल असे वाटते.

प्रकरण निहाय रचना :

प्रस्तुत शोध प्रबंधाची मांडणी खालील प्रमाणे प्रकरण निहाय करण्यात येईल.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचे महत्त्व, संशोधनाचा कालखंड, हेतू, उद्दिष्टे, संशोधन पद्धती व संशोधनाची व्याप्ती व स्वरूप स्पष्ट करण्यात येईल व त्या बरोबरच, शिवपुर्व काळ व स्वराज्याची स्थापना याचा मागोवा घेउन श्री छत्रपती शिवरायांचे प्रारंभीचे सहकारी व त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे - छत्रपती शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील सेनापतींचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान व भूमिका

प्रस्तुत प्रकरणांमध्ये स्वराज्य स्थापनेमध्ये प्रारंभीच्या सेनापतींचे योगदान यामध्ये प्रामुख्याने तुकोजी चोर, माणकोजी दहातोंडे, नूर बेग, येसाजी कंक आदि सेनापतींच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेऊन छत्रपती शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळाची निर्मिती, सेनापतींचे कर्तव्य, त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान व त्यांच्या भूमिका याचा विस्तृत आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे - स्वराज्याच्या उभारणीत सेनापती नेताजी पालकर यांचे योगदान

या प्रकरणांमध्ये नेताजी पालकर यांचे पूर्व आयुष्य, छत्रपती शिवाजी महाराज व नेताजी पालकर यांचे नातेसंबंध, सरनोबत नेताजींची कामगिरी, नेताजींची शहापूर स्वारी, नेताजींनी शाहिस्तेखानाचा केलेला प्रतिकार, नेताजी पालकर यांनी केलेले न्यायनिवाडे, त्यांची मुद्रा ते नेताजींच्या मृत्यूपर्यंत सर्व महत्त्वाच्या घटनांचा विस्तृतपणे आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे - स्वराज्याच्या उभारणीत सेनापती प्रतापराव गुजर यांचे योगदान

या प्रकरणांमध्ये सेनापती प्रतापराव गुजर यांची सेनापतीपदापूर्वीची कामगिरी, पन्हाळ्याच्या वेढ्याप्रसंगीची कामगिरी, मिर्झाराजे जयसिंगावर केलेल्या हल्ल्याचा अयशस्वी प्रयत्न, मराठे - मुघल शांतता तह, सेनापती प्रतापरावांची आक्रमक धोरण, प्रतापरावांनी मुंगी पैठण वर केलेली स्वारी, दुसऱ्या सुरत लुटीत सहभाग, मुघल मुलखात चौथाईची अंमलबजावणी,

साल्हेरचा रणसंग्राम, सेनापती प्रतापरावांची आदिलशाही प्रदेशावरील स्वारी, कर्नाटक स्वारी, नेसरीचे युद्ध ते प्रतापरावांच्या मृत्यूपर्यंत सर्व महत्त्वाच्या घटनांची विस्तृतपणे मांडणी करण्यात येईल.

प्रकरण पाचवे - स्वराज्याच्या उभारणीत सेनापती हंबीरराव मोहिते यांचे योगदान.

सदरील प्रकरणांमध्ये सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या सेनापती नियुक्ती पासून त्यांची महत्त्वाची कामगिरी, शिवराज्याभिषेक सोहळ्यात सेनापती हंबीरराव मोहिते यांचा सन्मान, हंबीररावांची लासुर स्वारी, कर्नाटक मोहिमेतील त्यांचे योगदान, हुसेन खान मियानाचा पाढाव, व्यंकोजी राजांवर विजय, वेल्लोरचा कोट काबीज, जालना मोहिमेतील सहभाग, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पश्चात संभाजी राजांच्या राज्यरोहणात हंबीररावांची मोलाची भूमिका, बुऱ्हानपूर लूट, आजमशहा व हंबीरराव यांच्यातील संघर्ष ते हंबीरराव मोहिते धारातीर्थी होईपर्यंतच्या इतिहासकालीन सर्व घटनांचा विस्तृतपणे आराखडा मांडण्यात येईल.

प्रकरण सहावे - उपसंहार व निष्कर्ष

"स्वराज्याच्या उभारणीत सेनापतींचे योगदान: एक ऐतिहासिक अभ्यास" या संशोधन विषयाचा आढावा घेत असताना स्वराज्याच्या उभारणीमध्ये छत्रपती शिवरायांना आपल्या प्राणाचे बलिदान देऊन सर्वतोपरी मदत करणाऱ्या सेनापतींच्या योगदानाचा मागोवा घेण्यात येईल व याद्वारे प्रस्तुत प्रकरणांमध्ये पूर्व प्रकरणाच्या आधारे जो निष्कर्ष निघेल त्या निष्कर्षाचा परामर्श या प्रकरणात घेण्यात येईल.

संशोधक;

काळे नागेश शिवाजीराव
जूना कौठा, नांदेड-४३१६०३
ता. जि. नांदेड.
संपर्क क्र. 9075349990

संशोधन मार्गदर्शक;

प्रा. डॉ. कोंडेकर राजु शिवाजी
राजीव गांधी वरिष्ठ महाविद्यालय
मुदखेड, ता. मुदखेड जि. नांदेड.
संपर्क क्र. 98508 81496

संदर्भ ग्रंथ सूची

प्राथमिक साधने :

१. आवळसकर शा. वि. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड १०, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५३.

२. कुलकर्णी अनुराधा गोविंद (संपा.), शिवछत्रपतींची पत्रे, खंड १ व २, परममित्र पब्लिकेशन्स्, ठाणे, २०११.

३. कुलकर्णी अनुराधा गोविंद, पटवर्धन अजित (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड - १५, डायमंड पब्लिकेशन्स, २०१२.

४. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र साहित्य खंड ६, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३७.

५. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र साहित्य, खंड १२, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९६४.

६. अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, संपा. कुलकर्णी अ. रा., प्रका. पाष्टे दत्तात्रेय गं., डायमंड पब्लिकेशन, पुणे. ऑक्टोबर, २००७ आ. पहिली, १९६८.

७. आपटे द. वि. व दिवेकर स.म., शिवचरित्र प्रदीप, भारत इतिहास संशोधन मंडळ, १३२१, सदाशिव पेठ, पुणे. मु. पराग अनंत पुरंदरे, ४१ गिरिजाधाम, राजेंद्र नगर, पुणे., पुनर्मुद्रण, २००९.

८. बेंद्रे वा. सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र (पुर्वार्ध व उत्तरार्ध), मु. पाटील ना. वि., साहित्यसहकार मुद्रनालय, कुलाबा, आ. पहिली, १ मे १९७२.

९. बेंद्रे वा. सी., मालोजी राजे आणि शहाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्रे, प्रका. बेंद्रे वा. सी., पुणे, आ. पहिली, १९६७.

१०. कदम उमेश अशोकराव, फ्रेंच-मराठा संबंध, १६६८-१८१८, प्रका. पुष्पनंद प्रकाशन पुणे. मु. श्री अंबिका प्रिंटर्स नारायण पेठ, पुणे. आ. प्रथम, २०११.

दुय्यम साधने :

१. आपटे द. वि., स. म. दिवेकर (संपा.), शिवचरित्र प्रदिप, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२५.

२. आवळसकर शा. वि. (संपा.), ऐतिहासिक साधने २. - ऐतिहासिक ग्रंथमाला क्रमांक २ (महाराष्ट्र शासन), मुंबई, १९६३.

३. काळे दि. वी. छत्रपती शिवाजी महाराज, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, १९७१.

४. कुलकर्णी अ. रा. (संपा.), जेधे शकावली करिना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, - २००७.

५. कुलकर्णी अ. रा. ग. ह. खरे (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड - १, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४.

६. कुलकर्णी अ. रा., म. रा. कुलकर्णी, मा. रा. कंटक (संपा.), मराठ्यांचा इतिहास साधन परिचय, डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे, २००८.
७. कुलकर्णी म. रा., महाराष्ट्रातील प्रसिद्ध सरदार घराणी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९.
८. केळूसकर कृष्णराव अर्जुन, क्षत्रिय कुलावंतस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, प्रकाशक र. दा. यंदे, पुणे, १९६५.
९. खरे ग. ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड २ भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५९.
१०. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्रवृत्त संग्रह, खंड २ (अली नामा), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३९.